क्रमांक : १३०

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

### गुरुवार, दिनांक २० ऑगस्ट, २०२६ / श्रावण २९, १९४८ (शके)

१३०. **लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण**

विधानसभेचे सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजी विधान भवन, नागपूर येथे सुरु होऊन रविवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या तृतीय सत्रात एकूण २२९ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. त्यापैकी १७७ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आलेली होती. ५२ निवेदनांपैकी १३ निवेदने सोमवार, दिनांक २७ एप्रिल, २०२६ रोजीच्या पत्रक भाग-दोन क्रमांक ७१ अन्वये मा. सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. आता ३९ निवेदनांपैकी १२ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत. उर्वरित प्रलंबित २७ निवेदनांचा संबंधित मंत्रालयीन विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

तसेच एम.के.सी.एल. तर्फे विकसित करण्यात आलेल्या MOIS या संगणकीय प्रणालीव्दारे सन्मा. विधानसभा सदस्यांनी संपूर्णत: ऑनलाईन (online) पध्दतीने लक्षवेधी सूचना दिलेल्या असल्यामुळे सन्मा. विधानसभा सदस्यांना ऑनलाईन (online) पध्दतीने उत्तर प्राप्त होणार असून उर्वरित प्रलंबित निवेदने प्राप्त झाल्यानंतर सर्व विधानसभा सदस्यांना पत्रक भाग-२ व्दारे अवगत करण्यात येईल.

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : २० ऑगस्ट, २०२६

मेघना तळेकर
सचिव-२,
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत :-**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) सचिव-१, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) सचिव-२, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
६) सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
७) सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष
९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये

१०) संगणक कक्ष (WEBSITE)

११) एम. के. सी. एल.

१२) अनुवाद कक्ष

१३) प्रतिवेदन कक्ष

# महाराष्ट्र विधानसभा
## सन- २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. १४६७**

श्री. प्रशांत बंब , विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४६७ पुढीलप्रमाणे आहे:-

"महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या सन १९६२ च्या स्थापनेपासून कायदेशीर सल्लागार महाव्यवस्थापक तथा विभाग प्रमुख (विधी व कामकाज) पदाची निर्मिती झालेली असणे, २०१६ मध्ये अर्हता धारक महिला उमेदवाराची सरळसेवेने निवड केलेली असणे, आठ वर्षांच्या कालावधीत संबंधित महिला अधिकारी यांनी या पदाचे "अधिकार आणि कर्तव्ये" याचा भाग असलेल्या खटल्यांचे व्यवस्थापन करताना शासनासाठी बहुतांश यश मिळवून दिलेले असणे, तथापि संबंधित महिला अधिकारी यांचेविरुद्ध अत्यंत घृणास्पद चारित्र्यहनन, अश्लील लिखाण करून एका व्यक्तीने नावासह दाखल केलेल्या तथ्यहीन तक्रारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रीतसर हाताळण्याऐवजी कोणतीही शहानिशा न करता थेट विभागप्रमुखाचे "अधिकार आणि कर्तव्याचे" शैक्षणिक-तांत्रिकदृष्ट्या अपात्र व विहीत अर्हता नसलेल्या कनिष्ठ व्यवस्थापकांना work distribution करणे, तक्रारदार महिलेची वकीलीची सनद रद्द झालेली असणे, यामुळे संबंधित २१/१०/२०२४ ची वर्क डिस्ट्रीब्यूशन ऑर्डर तात्काळ रद्द करुन उक्त महिला अधिकारी यांना त्यांच्या धारण पदानुसार पूर्ववत अधिकाराने काम करु देण्याची आवश्यकता असणे, कामाच्या ठिकाणी महिला अधिकाऱ्यांविरुद्ध अधिकार कक्षेबाहेर जाऊन कट कारस्थानपूर्वक चारित्र्यहनन मोहीम राबविणाऱ्या महाव्यवस्थापक (म.ब.वि) व संबंधितांना निलंबनाधीन ठेवून विभागीय चौकशी लावणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

## मा.मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

मऔवि महामंडळात कायदेशीर सल्लागार (अर्धवेळ) या पदाची निर्मिती मऔवि महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठक क्र.१, दि.१८/०८/१९६२ रोजीच्या बैठकीमधील ठराव क्र.७ नुसार करण्यात आली होती. तद्नंतर सहाय्यक विधी अधिकारी या पदाची निर्मिती संचालक मंडळाच्या बैठक क्र.१६१, दि.२२/०६/१९७९ रोजीच्या बैठकी मधील ठराव क्र.१६५८ मध्ये झालेल्या निर्णयानुसार करण्यात आली आहे. तसेच मऔवि महामंडळाच्या संचालक मंडळ बैठक क्र.१६६, दि.२२/०६/१९७९ रोजीच्या बैठकीमधील ठराव क्र. १७५८ मध्ये झालेल्या निर्णयानुसार सदर पद दि.०१/०३/१९८० ते दि.२८/०२/१९८३ या कालावधीपर्यंत सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला असून सदर बैठकीमधील ठराव क्र. १७७८ नुसार सहाय्यक विधी अधिकारी या पदास विधी व कामकाज विभागाचे प्रमुख घोषित करण्यात आले होते. तद्नंतर संचालक मंडळाच्या बैठक क्र.१८७, दि.२१/०३/१९८४ रोजीच्या बैठकीमध्ये श्री. एस. जी. कापरे हे सहाय्यक विधी अधिकारी असल्याचा उल्लेख आढळून येतो. दि.२८/०५/१९८१ संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये महाव्यवस्थापक (विधी) या पदाची निर्मिती करण्यात आली. संचालक मंडळाच्या बैठक क्र.१८८, दि. २८/०६/१९८४ रोजीच्या बैठकीमध्ये श्री. शंकर कापरे हे महाव्यवस्थापक (विधी) असल्याचा उल्लेख आढळून आलेला असल्याने सदर पद हे सदर कालावधीपासून महामंडळामध्ये अस्तित्वात आहे.

मऔवि महामंडळाच्या आस्थापनेवरील महाव्यवस्थापक (विधी) या रिक्त पदावर पूर्ण वेळ अधिकाऱ्याची नियुक्ती करणेकामी सदर पद सरळसेवा भरतीद्वारे भरणेकरीता दि.११/०७/२०१६ रोजी

जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांच्या अध्यक्षतेखालील समितीने दि.२९/०९/२०१६ रोजी मुलाखत घेतली होती. सदर मुलाखतीच्या निकालाअंती श्रीमती स्मिता आनंद चावरे यांना सर्वाधिक गुण मिळाल्याने त्यांना महाव्यवस्थापक (विधी) या पदावर नियुक्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने श्रीमती स्मिता आनंद चावरे यांची महामंडळामध्ये महाव्यवस्थापक (विधी) या पदावर दि.१६/११/२०१६ रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

श्रीमती बोरीकर यांच्या विरोधात त्यांची महाव्यवस्थापक (विधी) या पदावरील नियुक्ती बेकायदेशीररित्या असल्याबाबतची तसेच त्यांनी सदर पदाचा गैरवापर करून केलेल्या अनियमिततेबाबत तक्रार प्राप्त झालेली होती. श्रीमती. बोरीकर यांचेविरोधात प्राप्त झालेल्या तक्रारींवर मऔवि महामंडळाने सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने कार्यवाही केलेली असून तक्रारीमध्ये असलेल्या आक्षेपार्ह लिखाणाचा उल्लेख कोणत्याही टिप्पणी अथवा पत्रामध्ये करण्यात आलेला नाही. तद्नंतर पिंपरी चिंचवड औद्योगिक क्षेत्रातील आकुर्डी, तालुका-हवेली, जिल्हा पुणे येथील सर्व्हे नं.१३७१२ च्या भूसंपादन प्रकरणी मा. उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करण्यास विलंब केला असल्याचे निदर्शनास आले. यावरून विधी विभागातील कामाची प्रलंबितता मोठ्या प्रमाणावर असल्याचे निदर्शनास आल्यामुळे विधी व कामकाज विभागातील दैनंदिन कामकाजाचा जलदगतीने निपटारा होण्यासाठी तसेच सदर विभागातील प्रलंबितता कमी करण्यासाठी प्रशासकीय कारणास्तव कामकाजाच्या सुलभतेसाठी सदर विभागातील दैनंदिन कामकाजाचे महाव्यवस्थापक (विधी) व व्यवस्थापक (विधी) यांचेमध्ये वर्गीकरण करण्यात आलेले असून सदर वर्गीकरण केल्यामुळे महामंडळाच्या विधी विभागातील दैनंदिन कामकाजाची प्रलंबितता कमी झालेली आहे. दि. २१/१०/२०२४ रोजी कार्यालयीन आदेश निर्गमीत करण्यात आले असून त्यानुसार श्रीमती स्मिता बोरीकर, महाव्यवस्थापक (विधी) यांना विदर्भ विभाग, श्री नितीन कातोरे, व्यवस्थापक (विधी) यांना पुणे विभाग, श्री. अखिलेश खराबे, व्यवस्थापक (विधी) यांना कोकण विभाग व श्रीमती प्रज्ञा जोशी, व्यवस्थापक (विधी) यांना मराठवाडा विभागाचा कार्यभार देण्यात आला आहे.

सदर कामकाज वर्गीकरण आदेशानुसार सद्यस्थितीत मऔवि महामंडळाच्या विधी विभागातील कामकाज सुरळीतपणे सुरु असून कामकाजाची प्रलंबितता कमी झालेली आहे. कामकाजाच्या वर्गीकरणाचा दि. २१/१०/२०२४ रोजीचा कार्यालयीन आदेश रद्द करण्याची विनंती श्रीमती बोरीकर यांनी त्यांच्या दि.२९/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये केलेली होती. तथापी सदर आदेश हा दैनंदिन कामकाजामध्ये सुसूत्रता आणून कामामध्ये गतीमानता आणण्याच्या हेतूने प्रशासकीय सुलभतेसाठी निर्गमित केलेला असल्याने श्रीमती बोरीकर यांनी केलेली विनंती ही सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने रद्द करण्यात आलेली आहे. श्रीमती बोरीकर यांच्या विरोधात प्राप्त झालेल्या तक्रारींमध्ये त्यांचेविरोधात गंभीर स्वरूपाचे आरोप करण्यात आले होते. सबब उक्त प्रकरणी कार्यवाही करताना मऔवि गहामंडळाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने प्रशासकीय बाबींवर प्राथमिक चौकशी करणेसाठी तक्रारीमध्ये नमूद केलेल्या विविध विभागांकडून माहिती मागविणे बाबतची प्रशासकीय कार्यवाही केलेली आहे. सदर कार्यवाही करताना मऔवि महामंडळाचा श्रीमती बोरीकर यांना त्रास देणेबाबतचा अथवा इतर कोणताही हेतू नाही.

************************

लक्षवेधी सूचना क्र. १५६०

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्री. अब्दुल सत्तार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १५६० पुढीलप्रमाणे आहे.**

"शेतकऱ्यांचा कापूस सीसीआयमार्फत खरेदी सुरू करणे, १ हेक्टरला १४ क्विंटल खरेदीची मर्यादा असणे, सिल्लोड-फुलंब्री तालुक्याच्या रुपेश सिंग सेंट्रल इनचार्ज असणे, १ हेक्टरला १४ क्विंटल खरेदीची मर्यादा असताना रुपेश सिंग सेंट्रल इनचार्ज शेतकऱ्याच्या सातबारावर खाडाखोड करून १ हेक्टरचे २ हेक्टर किंवा ४ हेक्टर करून या शेतकऱ्यांच्या नावावर व्यापाराचा कापूस खरेदी करून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करणे, एका गाठीला ७०० रुपये प्रमाणे लाच घेणे, सिल्लोड सहकारी जिनींगवर कापूस खरेदी सुरू करणेबाबत मान्यता मिळणे, सिल्लोड जिनिंगने टेंडर सुद्धा भरलेला असणे, परंतु अद्याप पावेतो सिल्लोड जिनिंग सुरू न करणे, खाजगी जिंनींगला कापूस खरेदी करणे, फुलंब्री तालुक्यातील सीसीआय कापूस खरेदीसाठी राजेंद्र फायबर्स व वरदहस्त जिनिंगला प्राधान्य देऊन मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार करणे, ४ महिने सीसीटीव्ही फुटेज ठेवणे अनिवार्य असणे, सिल्लोड जिंनींगला सीसीआय कापूस खरेदी न केल्यामुळे सिल्लोड तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणे, याकरिता सिल्लोड जिनीग वर सीसीआय कापूस खरेदी सुरू करणेबाबत व भ्रष्ट सेंट्रल इनचार्ज रुपेश सिंग याच्याविरोधात शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. मंत्री, पणन यांचे निवेदन

किमान आधारभूत किंमत दराने कापूस खरेदी करण्यासाठी केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या अंतर्गत भारतीय कपास निगम लि. ही नोडल संस्था आहे. कापूस हंगाम २०२५-२०२६ मध्ये सुरळीत आणि अखंड कापूस खरेदीसाठी भारतीय कपास निगमने कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या स्व-नोंदणीसाठी "कपास किसान" हे मोबाईल ॲप विकसित केले आहे. सदर ॲपवर शेतकरी स्व-नोंदणी दि.०१.०९.२०२५ पासून सुरु झाली असून, नोंदणीकरीताचा अंतिम दि.३१.१२.२०२५ आहे. ज्या शेतकऱ्यांची सदर ॲपवर नोंदणी झाली आहे अशा शेतकऱ्यांची दि.१५.१०.२०२५ पासून भारतीय कपास निगमकडे कापूस खरेदी सुरू झाली आहे.

भारतीय कपास निगम हे कृषी विभागाकडून प्राप्त कापसाची प्रति हेक्टरी जिल्हानिहाय उत्पादकता, शेतकऱ्यांच्या जमिनीचे क्षेत्रफळ आणि कापूस लागवडीखालील क्षेत्र यावर आधारित कापूस खरेदी शेतकऱ्यांकडून करते. कृषी विभागाने जिल्ह्यात घेतलेल्या उच्चतम उत्पादन असलेले २५ टक्के पीक कापणी प्रयोगातील उत्पादनानुसार जिल्हानिहाय प्रति हेक्टरी उत्पादकतेबद्दल सादर केलेली माहिती कपास किसान ॲपवर अपलोड करण्यात आली आहे. राज्यातील सोलापूर जिल्ह्याची किमान ६.८३ क्विंटल/हेक्टरी उत्पादकता तर लातूर जिल्ह्याची कमाल २४.७१ क्विंटल/हेक्टरी उत्पादकता आहे. तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १४.१५ क्विंटल पर हेक्टरी उत्पादकता आहे.

त्यानुसार भारतीय कपास निगम शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी करत आहे. शेतकऱ्यांचे प्रत्यक्ष कापूस उत्पादन सरासरी उत्पादनापेक्षा जास्त असेल तर शेतकऱ्यांनी स्थानिक प्राधिकरणाकडून (महसूल व कृषी अधिकारी) उत्पादनाचे प्रमाणपत्र घेवून ते भारतीय कपास निगमच्या खरेदी केंद्रावर सादर करावे अशी केंद्र शासनाच्या सूचना आहेत. दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये राज्यात सर्वत्र २३ क्विंटल प्रति हेक्टर इतका कापूस उत्पादकतेस कृषि आयुक्तालयानी मान्यता दिली आहे.

कपास किसान ॲपवर शेतकरी स्वतः ऑनलाईन नोंदणी करतात. नोंदणीदरम्यान जमीन नोंदवहीचे दस्ताऐवज जसे की ७/१२ तसेच पिक पेऱ्यातील कापसाच्या लागवडीचे क्षेत्रफळ इत्यादी तपशील शेतकरी स्वतः भरतो आणि त्याची ऑनलाईन पडताळणी करून प्रमाणीकरण संबंधित कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत केले जात आहे. सदर कागदपत्रे बाजार समितीमार्फत सत्यतेबाबतची पडताळणी प्रमाणीकरण केल्यानंतरच शेतकऱ्यांच्या सात/बारा उतारामध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड किंवा बदल करता येत नाही. तसेच केंद्रप्रमुख यांचेकडून भ्रष्टाचार झाल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

CCI कडून सिल्लोड केंद्राकरीता १८ फॅक्टरीच्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यामध्ये मेसर्स सिल्लोड सहकारी जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीचा निविदा देकार L-११ असा होता. उचित प्रक्रिया अवलंबून प्राधान्यक्रमानुसार फॅक्टरी सुरू करण्यात आल्या.

फुलंब्री केंद्रावर भारतीय कपास निगम तर्फे मेसर्स राजेंद्र फायबर्स आणि वरदहस्त जिनिंग फॅक्टरी ही शेतकऱ्यांकडून कापसाची खरेदी करत आहे. दि. ०८.१२.२०२५ अखेर फुलंब्री केंद्रावर १८२२३ क्विंटल कापसाची खरेदी झालेली आहे. मात्र सदर केंद्राबाबत भारतीय कपास निगम ला कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही. भारतीय कपास निगम मार्फत फॅक्टरी सोबत करावयाच्या करारनाम्यामध्ये अट क्रमांक part-c-९ नुसार कमीत कमी ६ महिने सीसीटीव्ही बॅक अप ठेवणे अनिवार्य आहे.

भारतीय कपास निगम मार्फत सिल्लोड केंद्रावर शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी सुरू असून, दि. ०८.१२.२०२५ अखेर ५४५५ क्विंटल कापूस खरेदी केला आहे.

---

लक्षवेधी सूचना क्र. ९४२ १४९ दु/४४५

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

**श्री. संजय पुराम, श्री. रामदास मसराम, श्री. भीमराव केराम, डॉ. मिलिंद नरोटे मा. विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ९४२ खालील प्रमाणे आहे :**

"भारतातील १३ राज्यांमध्ये गोंडी भाषा बोलली जात असून मध्य भारतासह ओरीसा, पश्चिम बंगाल, कर्नाटक व महाराष्ट्रात सुद्धा गोंडी भाषा अवगत असणारे व बोलणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असणे, मादाव शंभूशेक यांच्या डमरूनादावरून गोंडी धर्मगुरू पहांदी पारी कुपार लिंगोने गोंडी भाषा तयार केली असल्याची आख्यायीका असणे, तेव्हापासून प्राचीन काळात गोंडी भाषा बोलणारे गोंडराजे म्हणून राजे-महाराजे यांचा इतिहास असणे, त्यामुळे गोंडी भाषा लुप्त होऊ नये, यासाठी भारतीय संविधानाच्या अनुसूची ८ मध्ये गोंडी भाषा समाविष्ट करून तीला राज्यभाषेचा दर्जा मिळावा, यासाठी राज्यातील गोंडी भाषीकांची मोठ्या प्रमाणात मागणी असणे, त्यासाठी राज्यशासानाने केंद्रशासनाकडे शिफारस करण्याची विनंती सुद्धा वारंवार करण्यात आली असणे, त्यामुळे राज्यशसनाने गोंडी भाषेला राज्यभाषेचा दर्जा मिळावा, यासाठी केंद्रशासनाकडे तातडीने शिफारस करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मंत्री (आदिवासी विकास) यांचे निवेदन

गोंड समाज भारतातील एक प्राचिन समुदाय आहे. गोंड समाजाचा महाराष्ट्र, छत्तीसगड व मध्य भारतभर विस्तार आहे. गोंडी भाषा ही मध्य भारतातील प्रमुख भाषांपैकी एक असून ती महाराष्ट्र राज्यातील विदर्भातील गडचिरोली, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने बोलली जाणारी एक प्राचीन भाषा आहे. गोंडी भाषेचा समृद्ध इतिहास, सांस्कृतिक महत्त्व, बोलणाऱ्यांची संख्या, तिची मौखिक व साहित्यिक परंपरा आणि अस्तित्वात असलेली गोंडी लिपी यांचा विचार करता या भाषेच्या सर्वांगीण संवर्धनासाठी भारतीय संविधानाच्या अनुसूची ८ मध्ये समाविष्ट करून तिला राज्यभाषेचा दर्जा मिळावा यासाठी विविध स्तरातुन मागणी करण्यात येत आहे.

कोणत्याही भाषेस भारतीय संविधानाच्या ८ व्या अनुसूचीमध्ये समाविष्ट करण्याची बाब ही केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे. ही बाब विचारात घेता, गोंडी भाषेचा समावेश केंद्र शासनाच्या सूचीमध्ये राज्यभाषा म्हणून करण्याच्या दृष्टीने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून पुढील आवश्यक ती कार्यवाहीचे नियोजन विभागामार्फत करण्यात येईल.

---

प्र/४४७

९८०

लक्षवेधी सूचना क्रमांक. १५९२

महाराष्ट्र विधानमंडळाचे हिवाळी अधिवेशन-२०२५.

**मा.श्री. सुधीर मुनगंटीवार,मा. श्री. राघवेंद्र (रामदादा) मनोहर पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम- १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना:**

"राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये कार्यरत असलेल्या संगणक परिचालकांना मागील काही महिन्यांपासून मानधन न मिळाल्यामुळे अत्यंत बिकट आर्थिक परिस्थितीचा सामना करावा लागणे, या संगणक परिचालकांचे जुलै २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीतील मानधन अद्याप थकीत असणे, तसेच जून २०२५ नंतरचे मानधनही थकीत असणे, याशिवाय गोंदिया जिल्ह्यासह काही जिल्हा परिषदांनी कोरोना काळातील प्रोत्साहनपर भत्ता देऊन कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढविले असताना त्याच धर्तीवर इतर जिल्ह्यांतील संगणक परिचालकांनाही हा लाभ द्यावा अशी मागणी संगणक परिचालक संघटनेने करणे, संगणक परिचालकांना ग्रामपंचायत सहायक म्हणून पद निश्चिती करून त्यांना वेतन व ग्रॅच्यूइटी देण्यात यावी ही मागणी संघटनेने करणे, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, संगणक परिचालकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**मा. मंत्री (ग्रामविकास) यांचे निवेदन:**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पंचायतराज संस्थांच्या कारभारामध्ये ई - पंचायत प्रकल्पांतर्गत अभिप्रेत असलेला सर्व कारभार संगणीकृत करुन एकसुत्रता व पारदर्शकता आणणे (G२G) , नागरिकांना विविध प्रशासकीय विभागांतर्गत आवश्यक सेवा दाखले (G२C) तसेच, इतर व्यावसायिक सेवा (B२C) व बँकिग सेवा (FI) इ. सेवा ग्रामीण जनतेला एकाच केंद्रावर त्यांच्या रहिवासी क्षेत्रात कालबध्द स्वरुपात मिळण्याच्या उद्देशाने राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये आपले सरकार सेवा केंद्र दि. ११ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आली आहेत. राज्यात २०,७९० इतके आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करण्यात आलेली आहेत. सदर केंद्रांमध्ये संगणक परिचालक/

ग्रामोद्योजक यांची नियुक्ती करण्यात येते. ग्रामपंचायत प्रशासनाचे संगणकीकरण (G२G व G२C) करण्यासाठी संगणक परिचालक/ ग्रामोद्योजक यांना दरमहा रू. १०,०००/- इतके मानधन देण्यात येते. याव्यतिरिक्त केंद्रचालक हे ग्रामोद्योजक (VLE) असून B२C सेवा ग्रामस्थांना पुरविल्यावर त्याचा अतिरिक्त मोबदला त्यांना देय असतो.

संगणक परिचालकांना G२G व G२C सेवेसाठी देय असलेली रूपये १०,०००/- प्रतिमाह मोबदल्याची रक्कम त्यांच्या उपस्थितीच्या प्रमाणात संबंधित ग्रामपंचायत त्यांच्या स्वनिधीतून प्रचलित देयक संगणक प्रणालीनुसार जिल्हा परिषदेमार्फत संचालक (पंचायतराज) राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे यांच्याकडे जमा करण्यात येते व त्यानंतर केंद्र चालकांचे मानधन त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाते. जिल्हा परिषदांना ग्रामपंचायतींचा एकत्रित निधी जमा करून संचालक (पंचायतराज) , राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, पुणे यांच्याकडे जमा करण्याच्या या प्रक्रियेला काही कालावधी लागत असल्याने, मानधन अदा करण्यास विलंब होतो. सध्या केंद्रचालकांचे ऑगस्ट, २०२५ पर्यंतचे मानधन अदा केले असून माहे सप्टेंबर, २०२५ चे मानधन अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

शासन परिपत्रक दि. ३१.०३.२०२० व शासन शुध्दीपत्रक दि. ०८.०४.२०२० अन्वये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर भत्ता देण्याबाबत व विमा काढण्याबाबत सुचना निर्गमित केल्या होत्या. त्यामध्ये ग्रामपंचायत स्तरावर सर्व ग्रामपंचायत कर्मचारी अंगणवाडी/ मिनी अंगणवाडी कार्यकर्त्या व अंगणवाडी मदतनीस, आशा कार्यकर्त्या, ग्रामविकास अधिकारी व सीएससी कंपनीचे केंद्र्चालक यांना त्यांना मिळणाऱ्या नियमित वेतन/मानधनाव्यतिरीक्त रु. १,०००/- इतकी प्रोत्साहनपर रक्कम अदा करण्यात यावी अश्या सूचना दिल्या आहेत.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची वेतन वाढ व आकृतिबंध सुधारित करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांच्या अध्यक्षतेखाली दि. २ फेब्रुवारी, २०१७ रोजी यावलकर

समिती गठीत करण्यात आली होती. संगणक परिचालकांना ग्रामपंचायत दर्जा देण्याच्या संदर्भात यावलकर समितीने आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पातील कार्यरत संगणक परिचालकांना ग्रामपंचायतीमध्ये सामावुन घेऊन ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा देण्याबाबत कोणतीही शिफारस केलेली नाही. तसेच वित्त विभागाने देखील बाह्य यंत्रणेव्दारे घेण्यात आलेल्या मनुष्यबळ सेवांना आकृतीबंधातील नियमित पदावर समाविष्ट करण्याची कोणतीही तरतूद केलेली नाही. तसेच यावलकर समितीने शिफारस केलेल्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या सुधारित आकृतिबंध प्रस्तावामध्ये आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्पातील कार्यरत संगणक परिचालकांना किमान वेतन देण्याबाबत तसेच ग्रामपंचायत दर्जा (ग्रामपंचायत सहायक) देण्याबाबत कोणतीही शिफारस केलेली नाही.

****************************************************************************************************************

लक्षवेधी सूचना क्र.१६८४

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

श्रीम.सना मलिक, मा.वि.स.स. यांनी विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१६८४ पुढीलप्रमाणे आहे,

" मे. योगायतन पोर्ट्स प्रा.लि. कंपनीने आजपर्यंत एकूण किती घन मीटर गाळ काढला आणि तो नेमका कोणत्या ठिकाणी टाकण्याची परवानगी दिली होती ? ट्रॉम्बे येथील मच्छीमारी क्षेत्रात सुमारे ७० हजार घन मीटर गाळ टाकल्याची तक्रार खरी आहे काय ? असल्यास, CRZ कायद्याचा भंग करणाऱ्या कंपनीवर व या कामात सहभागी असलेल्या महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डाच्या संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांवर शासन कोणती कठोर कारवाई करणार आहे ? मच्छिमारांना तातडीने दिलासा देण्यासाठी, सदर अनधिकृत गाळ विहित ठिकाणी उचलून टाकण्यासाठी आणि बाधितांना नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

---

## मा. मंत्री महोदय, बंदरे यांचे निवेदन

रस्ते व रेल्वे मार्गाने होणाऱ्या मालवाहतूकीच्या तुलनेत जलवाहतूकीव्दारे होणारी मालवाहतूक किफायतशीर व पर्यावरणस्नेही असल्यामुळे जलवाहतूकीला चालना देण्यासाठी शासन प्रयत्नशील असून, त्यासाठी खाजगी क्षेत्राच्या सहभागाने बंदरविषयक सुविधा निर्माण करण्याचे शासनाचे धोरण आहे.

वाशी खाडीत मानखुर्दनजीक मौजे तुर्भे (जि.मुंबई उपनगर) येथे मालवाहतूकीसाठी जेट्टी व तदनुषंगिक सुविधा उभारण्यासाठी मे. योगायतन पोर्टस् प्रा.लि. ह्या कंपनीच्या प्रस्तावास अनुसरुन, महाराष्ट्र सागरी मंडळाने ह्या जेट्टी सुविधांचे बांधकाम, कार्यचालन व व्यवस्थापन यासाठी शासनाच्या मान्यतेने कंपनीशी दि.२२.१०.२००९ रोजी ३० वर्षासाठी करारनामा स्वाक्षांकित केला आहे.

सदर जेट्टी प्रकल्पाला पर्यावरण विभागाच्या महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथोरिटी (MCZMA) यांच्याकडील दि. ०२.०२.२०११ आणि State Level Environment Impact Assessment Authority (SEIAA) यांच्याकडील दि. दि.०१.०९.२०१८ रोजीच्या पत्रान्वये पर्यावरणविषयक मंजूरी प्रदान करण्यात आल्या आहेत. सदरहू पर्यावरण मंजूरीमध्ये, मे. योगायतन पोर्टस् यांच्या उपरोल्लिखित जेट्टी प्रकल्पामधून जहाजाव्दारे सुरळीत व सुरक्षितपणे मालवाहतूकीसाठी गाळ उपसणी (ड्रेजिंग) करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे.

महाराष्ट्र सागरी मंडळ आणि मे. योगायतन पोर्टस् कंपनी यांच्यामध्ये स्वाक्षांकित झालेल्या उपरोक्त दि. २२/१०/२००९ रोजीच्या करारनाम्यात, मे. योगायतन पोर्टस् यांनी सुरक्षित व सुरळीत नौकानयनासाठी महाराष्ट्र सागरी मंडळाच्या परवानगीने गाळ उपसणी करावी, अशी तरतूद आहे. त्यानुसार, नौकानयन मार्गातील गाळ उपसणी करण्याकरिता महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत मे. योगायतन पोर्टस् यांना त्यांच्या विनंतीनुसार वेळोवेळी परवानगी देण्यात येते. सदरहू परवानगीमध्ये, उपसणी केलेला गाळ विशिष्ट ठिकाणी टाकण्यासाठी मुंबई बंदर प्राधिकरण यांच्याकडून परवानगी घेण्यात यावी, अशी अट नमूद असते. त्यानुसार,

- मुंबई बंदर विश्वस्त यांचेकडून कंपनीला देण्यात आलेल्या परवानगीपत्रात, सदरचा गाळ टाकण्याचे ठिकाण EBB Dumping Ground Location DG-B (अक्षांश १८० ४६.२०' व रेखांश ७२० ४७.५') असे नमूद करण्यात आले आहे.

मे.योगायतन पोर्टस् यांच्यामार्फत नौवहन मार्गात सन २०२२-२३ ते सन २०२५-२६ (आतापर्यंत) वेळोवेळी केलेल्या गाळ उपसणीमध्ये एकूण १,७३,११६ घनमीटर इतका गाळ काढण्यात आला आहे. याबाबत कंपनीकडून महाराष्ट्र सागरी मंडळाकडे वेळोवेळी अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

-------------------------

लक्षवेधी सूचना क्र. १६९३

महाराष्ट्र विधानसभा, सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

**श्री. राहूल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. १६९३ पुढीलप्रमाणे आहे.**

"राज्यात १६ लाख ८७ हजार हेक्टर क्षेत्रावर कापसाची लागवड करण्यात येणे, त्यानुसार राज्यात किमान ५५५ कापूस खरेदी केंद्राची आवश्यकता असतांना भारतीय कापूस महामंडळाने राज्यात केवळ ८९ केंद्रे सध्या सुरु केलेले असणे, शासनाने शेतक-यांसाठी 'कापूस किसान' ॲप तयार करणे, या ॲपमध्ये नोंदणी प्रक्रिया, ओटीपी इत्यादी क्लिष्ट असणे, त्यामुळे शेतक-यांना सदरहू प्रक्रिया कळत नसून या प्रक्रियेवर शेतक-यांना निर्भर राहता येत नसणे, शेतक-यांनी शासनाकडे यासंदर्भात अनेक तक्रारी केलेल्या असणे, तसेच कृषि विभागास गेल्या पाच वर्षापासून विविध योजनांसाठी मंजूर केलेली १२ हजार कोटी रुपयांची थकबाकी अदयापि देण्यात आलेली नसणे, त्यामुळे राज्याचा कृषी विभागच मोठ्या आर्थिक संकटात सापडला असणे, परिणामी राज्यातील शेतक-यांना विविध योजनांच्या लाभापासून वंचित रहावे लागणे, शेतक-यांमध्ये शासनाच्या उदासिनतेबाबत निर्माण झालेले असंतोषाची व संतापाची भावना, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

**मा. मंत्री, पणन यांचे निवेदन**

राज्यात कापूस हंगाम २०२५-२०२६ मधील कापसाचे लागवडी खालील क्षेत्र ३८.४० लाख हेक्टर आहे. सदर कापूस हंगामामध्ये राज्यात भारतीय कपास निगमद्वारे मागील कापूस हंगामाच्या तुलनेत ४४ अधिकची कापूस खरेदी केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. सद्यस्थितीत राज्यात एकूण १६८ कापूस खरेदी केंद्रे असून त्यापैकी १६२ खरेदी केंद्रे कार्यरत आहेत. सदर कार्यरत १६२ केंद्राअंतर्गत ५४८ जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीवर शेतकऱ्यांकडून कापूस खरेदीच प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडली जात आहे.

कापूस हंगाम २०२५-२०२६ मध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांना सुविधा देण्यासाठी आणि कापूस खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी भारतीय कपास निगमने "कपास किसान" हे मोबाईल ॲप विकसित केले आहे. सदर ॲपचे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना सोयीस्कर डिजिटल सेवा प्रदान करणे, खरेदी केंद्रांवरील गर्दी नियंत्रित करणे आणि अनावश्यक हालचाल रोखणे हे उद्दिष्ट आहे.

सदर ॲपवर शेतकऱ्यांची स्व-नोंदणी दि.०१.०९.२०२५ पासून सुरु झाली आहे. आतापर्यंत राज्यातील एकूण ९.१२ लाख कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी कपास किसान मोबाईल ॲपद्वारे कापूस खरेदीकरीता यशस्वीरित्या नोंदणी केली आहे. सदर ॲपवर नोंदणी झालेल्या कापूस उत्पादक शेकऱ्यांची ओळख पटविणे ओटीपीमुळे शक्य आहे. दि.०४.०२.२०२६ पर्यंत ४,८३,०७३ कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी भारतीय कपास निगमला त्यांचा कापूस विकला आहे.

सन २०१४-१५ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-वाणिज्यिक पिके या अंतर्गत कापूस विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सदर योजना सन २०२५-२६ पासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान (NFSNM) या नावाने राबविण्यात येणार आहे. यासाठी केंद्र राज्य (६०:४०) याप्रमाणे कार्यक्रम राबविण्यात

येणार आहे. अन्नधान्याच्या गरजेसोबतच नगदी पिकांची गरज भागविण्यासाठी कापूस पिकाचा योजनेत समावेश करण्यात आला आहे.

सदर योजनेंतर्गत एकात्मिक पिक व्यवस्थापन आद्यरेषीय प्रात्यक्षिके, आंतरपीक पद्धतीची आद्यरेषीय प्रात्यक्षिके (कापूस पिकात मूग, उडीद), कपाशीच्या सरळ वाणांच्या अतीघन लागवडीच्या चाचण्या, पिक संरक्षण औषधी व बायो एजंटसचे वितरण, आद्यरेषीय प्रात्यक्षिके (देशी आणि अति लांब धाग्याच्या कापसाचे बिजोत्पादन, ऑनलाईन पेस्ट मॉनिटरिंग अँण्ड अॅडवायझरी सिस्टीम (ओपीएमएएस), कापूस पिकाचे फरदड निर्मुलन प्रात्यक्षिके व बायोचार युनिट इत्यादी घटक राबविण्यात येत आहेत.

कृषी विभागास गेल्या पाच वर्षापासून राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियान वाणिज्यिक पिके - कापूस विकास कार्यक्रम योजनेंतर्गत मंजूर केलेला कार्यक्रम, प्राप्त निधी व खर्च इत्यादी तपशिल खालीलप्रमाणे आहे -

| अ.क्र. | वर्ष | मंजूर कर्यक्रम (प्रलंबित निधीसह) (रक्कम रु. लाख) | प्राप्त निधी (रक्कम रु. लाख) | खर्च (रक्कम रु. लाख) |
|---|---|---|---|---|
| १ | २०२१-२२ | ४६७.०० | ३४२.९० | ३२३.८३ |
| २ | २०२२-२३ | ४३८.५० | २३२.६२ | २१४.११ |
| ३ | २०२३-२४ | ६७२.२८ | ५२२.७० | ४०६.६१ |
| ४ | २०२४-२५ | ६६२.०९ | ४४७.८० | ३४७.८१ |
| ५ | २०२५-२६ | ६५१.३६ | ३२५.७५ | ३१०.१४ (दि.२.२.२०२६ अखेर)) |

कापूस पिकाची उत्पादकता वाढवणे व मूल्यसाखळी विकासासाठी सन २०२२-२३ ते सन २०२४-२५ या तीन वर्षाकरीता राज्यात १००% राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस विकास व मूल्यसाखळी योजना राबविण्यात आलेली आहे. याकरीता रक्कम रु. ४५० कोटी निधीची तरतूद करण्यात आली होती. या योजनेंतर्गत सन २०२२-२३ ते सन २०२४-२५ या कालावधीत रक्कम रु. ३५३.३३ कोटी निधी खर्च करण्यात आलेला आहे.

खरीप हंगाम सन २०२३ मध्ये आंतरराष्ट्रीय घडामोडी व अन्य कारणांमुळे झालेल्या किंमतीतील घसरणीमुळे शेतक-यांना नुकसान सोसावे लागले, शेतक-यांना दिलासा देण्यासाठी खरीप हंगाम २०२३ मध्ये कापूस उत्पादक शेतक-यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी ५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य दि. २९ जुलै, २०२४ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आले आहे. सदर योजना १००% राज्य पुरस्कृत असून या योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२३ मध्ये ई-पिक पाहणी केलेल्या वनपट्टाधारक शेतकरी, जिवती तालुक्यातील (Non digitalised villages) खातेदार व खरीप २०२३ मध्ये ७/१२ उता-यावर कापूस पिकाची नोंद असलेल्या २१,२७,२५७ शेतक-यांना (२,४१,५०,१३८ खाते) कापूस उत्पादक शेतक-यांना रक्कम रु.९९५.६४ कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे. सदर राज्य पुरस्कृत योजना सन २०२४-२५ या वर्षाकरीता लागू होती. उपरोक्त तीन्ही योजनेंतर्गत सन २०२४- २०२५ पर्यंत कोणतेही प्रलंबित दायित्व शिल्लक नाही.

---

महाराष्ट्र विधानमंडळ हिवाळी (नागपूर) अधिवेशन, २०२५

श्री. नानाभाऊ पटोले वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली

**लक्षवेधी सूचना क्रमांक -१७२६**

"मुंबईतील कांदिवली पश्चिम येथील विशाल सह्याद्री गृहनिर्माण संस्थेच्या अध्यक्ष व सचिव यांच्या मनमानी कारभाराबाबत चौकशी करुन विद्यमान समिती बरखास्त करुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ७७ (अ) नुसार प्राधिकृत अधिकारी यांची नेमणूक, तसेच संस्थेवर कायदेशीर कार्यवाही करण्याबाबतची मागणी संस्थेच्या ६५० सभासदांनी दि. ३०-९-२५ रोजी शासनाकडे केलेली असणे, सहकार कायदा कलम ७६ (१) (एक) या कलमानुसार संस्थेतील गैरप्रकाराबाबत पत्र देऊन एक महिन्याचा कालावधी उलटूनसुध्दा संस्थेकडून कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, संस्थेने दि. ०४/१०/२०२५ रोजीच्या सूचनेमध्ये पुनर्विकासाच्या अनुषंगाने विकासकाने तयार केलेल्या आराखड्यांचे सादरीकरण करणे व विधी सल्लागाराने तयार केलेला विकसन करारनामा सूचना हरकतीसह संस्थेच्या ६५० पेक्षा जास्त सदस्यांचे मत डावलून संस्थेचे संचालक सुहास भोईटे यांनी ज्या सभासदांना विकसन करारनामासंदर्भात मंजूरीकरिता हात वर करण्याचे आव्हान करुन विकसन करारनाम्यावर मंजूरी घेऊन सहकारी कायद्यांचे उल्लंघन केले, संस्थेने केवळ मर्जीतील व्यक्तींना पुनर्विकास उपसमितीत कोणत्याही सर्वसाधारण सभेचा ठराव नसताना अवैधपणे नियुक्ती केलेली असणे, संस्थेच्या अध्यक्ष, सचिव यांच्या गैरकारभाराबाबत तक्रारदार श्री जगताप यांनी उपनिबंधक सहकारी संस्था, आर-दक्षिण विभाग यांचेकडे तक्रारी करुनही उपनिबंधक यांनी तक्रारीबाबत कार्यालयाकडून कोणतीही कारवाई करण्याचा अधिकार नसल्याचे दि.२६-११-२०२५रोजी कारणे देऊन सदर गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांना वाचविण्याचा प्रयत्न करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रया."

**मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन**

विशाल सह्याद्री को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., सह्याद्री नगर, चारकोप, कांदिवली (प.), मुंबई-४०००६७ ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ९ (१) अन्वये नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था असून ती जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (४), मुंबई यांचे अधिनस्त उपनिबंधक, सहकारी संस्था/आर-दक्षिण यांच्या कार्यक्षेत्रात येते. सदर गृहनिर्माण संस्थेत एकूण २१५४ सभासद असून, संस्थेचे सभासद श्री. सुरेश आबाजी जगताप यांनी दिनांक ०३/११/२०२५ रोजी उपनिबंधक, सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग यांचेकडे विशाल सह्याद्री को-ऑप. हौसिंग सोसायटी लि या संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेचे कामकाज व त्यात पारित ठरावांच्या वैधतेबाबत तक्रार अर्ज सादर केला होता. तथापि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत, सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सर्वसाधारण अथवा विशेष सर्वसाधारण सभेतील ठरावांच्या वैधतेबाबत निर्णय देण्याचा अधिकार उपनिबंधक, सहकारी संस्था यांना नसून, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधील उपविधी क्र. १७४(ब) नुसार सदर बाबींचा अधिकार मा. सहकार न्यायालयास आहे. त्यामुळे उपनिबंधक कार्यालयाने दिनांक २६/११/२०२५ रोजी तक्रारदारास लेखी उत्तर देऊन,

संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेच्या कामकाजाबाबत मा.सहकार न्यायालयाकडे योग्य ती दाद मागण्याबाबत अवगत केले आहे.

संस्थेच्या पुनर्विकासाबाबत विकासकांनी तयार केलेल्या आराखडयाच्या सादरीकरणावरील सूचना/हरकती संदर्भात विशाल सहयाद्री को.ऑप.हौसिंग सोसायटीच्या ६५० सभासदांनी सोसायटीचे अध्यक्ष/सचिव यांचेकडे दि.३०.०९.२०२५ रोजी अर्ज सादर केला आहे. सदर अर्जाची प्रत श्री.सुरेश जगताप, सभासद, विशाल सहयाद्री गृहनिर्माण संस्था, कांदिवली यांच्या दि.०२.०२.२०२६ च्या पत्रासोबत, शासनास व उपनिबंधक, सहकारी संस्था, आर दक्षिण विभाग, मुंबई या कार्यालयास प्राप्त झाली आहे. सदर अर्जान्वये संस्थेच्या ६५० सभासदांनी संस्थेच्या पुनर्विकाससंदर्भात संबंधित विकासकाने केलेल्या आराखडयाच्या सादरीकरणाबाबत तसेच संस्थेच्या पुनर्विकास उपसमितीबाबत आक्षेप नोंदवून, आवश्यक ते बदल करण्याबाबत संस्थेस निवेदन सादर केल्याचे दिसून येते. तथापि, संस्थेच्या ६५० सभासदांच्या सदर विनंतीकडे संबंधित संस्थेने दुर्लक्ष केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने, संस्थेच्या सर्व संचालकांना उपनिबंधक, आर दक्षिण विभाग यांच्या दि.१६.०२.२०२६ च्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७६ (२) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत प्रकरणी सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे.

***************

e

लक्षवेधी सूचना क्र. ३२४

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

श्री. चेतन तुपे, श्री. शंकर मांडेकर, श्री. प्रतापराव पाटील चिखलीकर, अँड. राहूल कुल, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. रोहित पाटील विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"पुणे-बंगलोर महामार्गावरील पुणे येथील नवले पूलावर दिनांक १३ नोव्हेंबर, २०२५ रोजी भरधाव कंटेनरने १७ वाहनांना धडक दिल्यामुळे लागलेल्या आगीत ८ जणांचा जागीच झालेला मृत्यु तसेच २५ ते ३० जण गंभीर जखमी होऊन त्यांची प्रकृती चिंताजनक असणे, राज्यातील सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, मुंबई, ठाणेसह इतर जिल्हयातून तसेच कर्नाटक, तामिळनाडू, केरळ या राज्यातून येणारी-जाणारी लाखो अवजड प्रवासी वाहने यामुळे वाढलेली रहदारी, पुणे येथील नवले पूल अरुंद असल्यामुळे शहरातील व शहराबाहेरील वाहनांची असंख्य संख्या यामुळे वर्षानुवर्षे होत असलेली वाहतूक कोंडी, १-२ किलोमीटर प्रवासासाठी अर्धातास ते १ तासापेक्षा जास्त वेळ लागणे, नेहमीच होत असलेली वाहतूक कोंडी व अपघात याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी वाहतूकदार व प्रवाशांचे मोठ्या प्रमाणावर होत असलेले हाल, आर्थिक नुकसान व वेळेचा अपव्यय, रहदारीच्या प्रमाणात अरुंद पूल/रस्ता अपूरा पडत असल्यामुळे हे अपघात टाळण्यासाठी व सुरळीत वाहतूक होण्यासाठी शासनाने तात्काळ पर्यायी व्यवस्था करण्याची तसेच कायमस्वरुपी मोठा रस्ता करण्याची आवश्यकता लक्षात घेता तात्काळ शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

## मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

दिनांक १३/११/२०२५ रोजी १७.४० वाजताचे सुमारास सेल्फी पॉईट ते एच.पी. पेट्रोलपंपाचे समोर साताऱ्याकडून मुंबई कडे जाणाऱ्या बेंगलोर-मुंबई हायवे लेनवर, नऱ्हे पुणे येथे ट्रक नंबर आर.जे. १४ जीजे १३०२ वरील चालकामुळे १४ वाहनांचा अपघात होऊन ८ व्यक्ती मृत्यूमूखी, १९ व्यक्ती जखमी झालेल्या आहेत. सदर अपघात चालकाने वेगावर नियंत्रण न ठेवता बेदरकारपणे वाहन चालवून इतर वाहनांचे नुकसानीस, स्वत:सह इतर व्यक्तींना गंभीर अपघात करुन मृत्यू घडवून आणणेस व इतर इसमांना जबर जखमी करण्यास

कारणीभूत झालेला आहे. याबाबत सिंहगड रोड पोलीस स्टेशन, पुणे शहर गुन्हा रजिस्टर क्र. ५२१/२०२५ भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम १०५, २८१, १२५ (ए), १२५ (बी) ३२४ (४) तसेच मोटार वाहन अधिनियम कलम १८४, ११९/१७७ गुन्हा दाखल आहे.

नमूद गुन्ह्याचा सखोल तपास चालू असून मयत इसमांचे पोस्टमार्टम अहवाल तसेच अपघातग्रस्त वाहनांचे तपासणी अहवाल प्राप्त झाले असून त्यानुषंगाने पुढील तपास करण्यात येत आहे. मृतांच्या नातेवाईकांना तसेच जखमींना गुन्ह्याची एफआयआर, घटनास्थळ पंचनामे व पोस्टमार्टम रिपोर्ट उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तसेच महसूल विभागाचे अधिकारी यांचेशी समन्वय ठेवून मयत इसमांचे वारसांना शासनाने घोषित केलेले अर्थसहाय्य मिळणेकामी योग्य ती कागदपत्रे पुरविण्यात आलेली आहेत.

अ) **मुंबई बेंगलोर हायवेवर नवले पूल परिसरातील अपघात रोखणेकरीता वाहतुक शाखा, पुणे शहर व प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांनी केलेल्या तातडीच्या उपाय योजना.**

- मुंबई बेंगलोर हायवेवर नवले पूल येथील अपघात कमी होणेकरीता दरीपूल, स्वामीनारायण मंदीर, नवले पूल, हॉटेल विश्वास समोर, वडगाव पूल येथे वाहतूकी संदर्भातील नो पार्किंग, नैरो ब्रीज, गो-स्लो, स्पीड लिमीट, पुढे तिव्र उतार आहे, **वाहने न्युट्रल करु नका इत्यादी साईन बोर्ड/डिजीटल बोर्ड लावणेत आले आहेत**.
- नवीन कात्रज बोगदा ते नवले पूल दरम्यान वेग मर्यादा ताशी ६० किमी प्रमाणे मर्यादित ठेवण्यात आली होती. तथापि सदर ठिकाणी होणारे अपघात रोखणेकरीता पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पुणे शहर यांनी त्यांचे जा.क्र. पोउआ/वाह/१०३६०/२०२५ दि. ०४/१२/२०२५ रोजी प्रसिध्दीपत्रकान्वये सदरची **वेग मर्यादा ताशी ६० किमी वरुन ताशी ४० किमी करण्यात आला असून** त्याप्रमाणे सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे.
- मुंबई-बेंगलोर महामार्ग क्रमांक ४८ (कात्रजकडून किवळेकडे) जाणाऱ्या लेन मार्गावर सकाळी ०८.०० वा. ते ११.०० वा. दरम्यान व सायंकाळी १७.०० वा. ते २१.०० वा. चे दरम्यान (किवळेकडून कात्रजचे दिशेने) जाणाऱ्या लेन मार्गावर जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय पुणे (गृहशाखा) यांचेकडील क्र. पगक/कावि/३१४/२०२५ दि. ०७/१०/२०२५ रोजी अन्वये **जड/अवजड वाहनांना बंदी/मनाई** करण्यात आलेली आहे.

- मुंबई बेंगलोर नॅशनल हायवेवर नऱ्हे सेल्फी पॉईट येथे २०१९ पासून ए.एन.पी.आर. **स्पीड लिमीट कॅमेरा** लावण्यात आला आहे. त्याच्याद्वारे २४ तास ओव्हर स्पीडच्या केसेस केल्या जातात.

| अ. क्र. | वर्ष | केसेस |
|---|---|---|
| १ | २०२२ | १२,७२६ |
| २ | २०२३ | ६०,७६६ |
| ३ | २०२४ | ५५,९२९ |
| ४ | १ जाने. ते १५ नोव्हेंबर, २०२५ | ३०,०१८ |
| | **एकूण** | **१,५९,४३९** |

- नवीन कात्रज बोगदा ते नवले ब्रीज महामार्गावरील ०३ ठिकाणी **अतिरिक्त स्वयंचलित स्पीड लिमीट कॅमेरे गॅन्टरी बसविणेचे काम सद्यस्थितीवर प्रगतीपथावर** आहे. जेणे करुन त्याव्दारे स्पीड, लेन कटींग व इतर वाहतूक नियमभंगाची कारवाई करून अपघात टाळण्यास मदत होईल.
- मुंबई बेंगलोर नेशनल हायवेवर होणारे अपघात व विश्वास हॉटेल समोर होणारे अपघात रोखण्याच्या दृष्टीने नॅशनल हायवे ऑथोरिटी, पुणे व पुणे महानगरपालिका यांचेकडे सतत पाठपुरावा करुन नवीन कात्रज बोगदा ते वडगाव पुलापर्यंत ठिक ठिकाणी योग्य त्या उपाय योजना सुचित करुन **हॉटेल विश्वास समोरील रस्ता रुंदीकरण** करण्यात आले. त्यामुळे वाहतूक सुरळीत होणेस मदत झालेली आहे.
- दि ०५/०५/२०२३ रोजी नवीन कात्रज बोगदा येथे **वाहतूक तपासणी नाका चौकी** उभारण्यात आली असून तेथे दिवसपाळी व रात्रपाळी करीता अंमलदार नेमण्यात आलेले आहे. तेथून इंटरसेप्टर वाहनाद्वारे वाहनांचे वेगावर नियंत्रणाकरिता दररोज जास्तीत जास्त वाहनांवर कारवाई केली जाते.
- हायवेवरील सातारा लेन व मुंबई लेन करीता २ **मोटार सायकल पेट्रोलींग** नेमण्यात आलेले असून दिवसपाळी व रात्रपाळी करीता १ अधिकारी व २ वाहतूक अंमलदार यांची नेमणूक करण्यात आली आहे.
- मुंबई बेंगलोर नॅशनल हायवेवरील **स्ट्रीट लाईट दुरुस्त** करण्यात आल्या असून नवले पूल व कटील हॉटेल येथे नवीन हाय मास्ट लॅम्प बसविण्यात आले आहेत.

- मुंबई बेंगलोर नॅशनल हायवे रोडवर **रम्बलर स्ट्रीपची संख्या व जाडी वाढविण्यात आली** आहे. जेणेकरुन वाहनचालक सतर्क होतील व वाहनांचा वेग कमी करतील.
- पी.एम.पी.एम.एल. बसेस करीता नवले पुलावरील **बस थांबा स्थलांतरीत** करण्यात आलेला आहे. सर्व्हिस रोडवर बस स्टॉप करीता अधिकृत बस थांबा तयार करण्यात आलेला आहे.
- रस्ता सुरक्षा पथकातील अधिकाऱ्यांकडून खेड-शिवापुर टोल नाका येथे वाहन चालकांची ब्रेथ ॲनालायझरद्वारे तपासणी करण्यात येते. तसेच वेगमर्यादेचे उल्लंघन करणारी वाहने, चुकीच्या मार्गिकेतुन जाणारी वाहने, लेन कटिंग करणारी वाहने, चुकीच्या बाजूने ओव्हरटेंकीग करणारी वाहने आणि वैध कागदपत्रे सादर न करणाऱ्या वाहनांवर नियमानुसार कारवाई करण्यात येत आहे.

**ब) सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन प्रस्तावित कायमस्वरुपी उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत:-**

या भागात वाढलेल्या नागरिकरणामुळे व वाढलेल्या प्रचंड वाहतुकीमुळे राज्य शासनाने पुणे रिंग रोड करण्याचे नियोजन केलेले असून पुणे रिंग रोड पूर्ण झाल्यानंतर कात्रज बोगदा ते नवले पूल या भागातील अवजड वाहनांची वाहतूक कोंडी कमी होऊन अपघात देखील कमी होणार आहेत. सदरचे काम राज्य शासनामार्फत सुरु करण्यात आलेले आहे.

दिर्घकालीन उपाय योजनेअंतर्गत नऱ्हे ते रावेत या दरम्यान एलिव्हेटेड कॉरिडॉरचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात आला आहे. एलिव्हेटेड कॉरिडॉरचा प्रकल्प २०२५-२६ च्या वार्षिक योजनेत समाविष्ट आहे. केंद्र शासनाच्या मंजुरीनंतर या उन्नत महामार्गाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्यातर्फे हाती घेण्यात येईल. नऱ्हे ते रावेत या भागातील एलिव्हेटेड कॉरिडॉरचे काम पूर्ण झाल्यानंतर स्थानिक वाहतूक ही मुख्य रस्त्यावर येणार नाही त्यामुळे पुणे सातारा रस्त्यावरील वाहतूक कोंडी व अपघात देखील कमी होण्यास मदत होणार आहे.

---

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२५ चे तृतीय ( हिवाळी ) अधिवेशन

श्री. नानाभाऊ पटोले, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. विकास ठाकरे, श्री. रामदास मसराम, श्री. अमिन पटेल, श्री. अस्लम शेख, श्रीमती ज्योती गायकवाड, श्री. विश्वजित कदम, श्री. संजय मेश्राम, श्री. अनिल मांगुळकर, डॉ. नितिन राऊत, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १४४० पुढीलप्रमाणे आहे. :-

" नागपूर येथे भरधाव वाहने चालवून अपघाताच्या घटना सातत्याने घडत असणे, येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आरबीआय चौकांत दुचाकीला टँकरने धडक दिल्याने जखमी झालेल्या अल्पवयीन बहिण भावाचा दुर्दैवी मृत्यू व एकजण गंभीर जखमी झाला असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास येणे, या अपघाताला कारणीभूत एनएल १ एजी ०८६८ क्रमांकाचा टँकरचालक फरार असणे, तसेच जुनी कामठी पोलीस ठाण्याच्या हददीत भरधाव वाहनाने धडक दिल्याने एका मजूराचा जागीच मृत्यू होणे, याही घटनेतील वाहनचालक फरार असणे, शहरात मागील काही महिन्यांपासून अपघातांच्या घटना सातत्याने घडत असून प्रशासनाच्या निष्काळजीपणामतुळे गुन्हे घडत असतानाही त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषांचे वातावरण व असुरक्षिततेची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

## मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत आर. बी. आय. चौकात दिनांक ०२/१२/२०२५ रोजी रात्री १०:१५ च्या सुमारास कंटेनर ट्रक क्रमांक एनएल/०१/एजी/०८६८ चे चालकाने त्याच्या ताब्यातील कंटेनर ट्रक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविताना मोटार सायकलला मागून जोरदार धडक दिल्यामुळे मोटार सायकल चालक व सोबत असलेली त्यांची १२ वर्षीय मुलगी गंभीर जखमी झाले आणि त्यांच्यासोबत असलेला त्यांचा अल्पवयीन मुलगा जागीच मृत्यू पावला. गंभीर जखमी झालेले मोटार सायकल वाहन चालक व त्याच्या मुलीस तातडीने मेयो हॉस्पिटल येथे नेण्यात आले असता त्या ठिकाणी गंभीर जखमी असलेली मुलगी देखील मृत पावली अशा दोन्ही बहीण भावाचा मृत्यु झाल्याबाबत नागपूर शहर सदर पोलीस ठाण्यात दिनांक ०३.१२.२०२५ रोजी गुन्हा क्रमांक अप क्र. ७३५/२०२५ नुसार कलम २८१, १२५ए, १२५ब, १०६(१) भा.न्या.स., सह कलम १३४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर

गुन्ह्यामध्ये आरोपी कंटेनर चालक रा. जंगल महाल, मिर्झापूर, उत्तर प्रदेश याचा शोध घेऊन दिनांक ०३.१२.२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास पूर्ण करून आरोपी विरूध्द सबळ साक्ष पुरावे मिळून आल्याने दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

तसेच जुनी कामठी हद्दीतील मेट्रो रेल्वेच्या बांधकामाच्या ठिकाणी इन्फ्रा कंपनीच्या लेबर कॅम्पमध्ये राहणारे कामगार यास अज्ञात वाहनाने मागून धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यु झाला. याबाबत जुनी पोलीस कामठी पोलीस ठाण्यात दिनांक ०२.१२.२०२५ रोजी गुन्हा क्रमांक अप क्र. ५६९/२०२५ नुसार कलम १०६, २८१, १०६ भा.न्या.स., सह कलम १८४, १३४,१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेत पोलीसांनी फिर्यादीच्या माहिती वर्णनावरुन अशोक लेलन्ड टिपर क्रमांक एमएच ४० एन ६८३८ चा चालक रा. सुरगाव, ता. उमरेड, जि. नागपूर यास अटक करण्यात आलेली आहे, सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

नागपूर शहरातून वाहतूक परिमंडळ हद्दीतून एक्सप्रेस वे, नॅशनल हायवे, स्टेट हायवे व इनर रिंग रोड असल्याने वाहतूक वर्दळीमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत असून त्याअंतर्गत नागपूर शहर हद्दीत वारंवार अपघात घडत असलेल्या १८ घटनास्थळ चिन्हांकित करुन रस्ते अपघातास आळा घालण्यासाठी "ऑपरेशन जीवन रक्षा" राबविण्यात आले. सदर चिन्हांकित स्थळी वाहनांचा वेग मंदावण्याकरिता बॅरिकेटसवर "वाहन हळू चालवा" असे रेडिअम स्टिकरद्वारे लिहून बॅरिकेटींग करुन पोलीस नेमण्यात आले आहेत. तसेच नागपूर शहर हद्दीत वाहतूक विभागाने जनजागृत्ती अभियान अंतर्गत दुचाकी वाहन चालकांना हेल्मेटचे वाटप करुन "हेल्मेट सक्तीने वापरणे" बाबत प्रोत्साहित केले आहे. तसेच दारु पिऊन वाहन चालविणाऱ्या दुचाकी/चारचाकी वाहन चालकांना "ऑपरेशन युटर्न" अभियान अंतर्गत तपासण्यात आले असून यामध्ये दोषी आढळल्यास संबंधित वाहन चालकाविरुध्द कारवाई करण्यात आली आहे. तसेच रस्त्यांवर आवश्यक त्या पायाभूत सुविधाबाबत उपाययोजना करणे ही बाब महानगरपालिका व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अखत्यारित असल्याने त्याबाबत आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात पोलीसांकडून त्यांना पत्रव्यवहार करण्यात येतो.

-------------

# महाराष्ट्र विधानसभा
## सन- २०२५ चे तिसरे (हिवाळी )अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.१४६२**

श्री. विजयबापू शिवतारे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४६२ पुढीलप्रमाणे आहे:-

"पुणे जिल्हयातील पुरंदर तालुक्यात नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ नियोजीत असणे. सदर विमानतळाच्या भूसंपादनाची प्रक्रीया सुरु असणे, शेतकऱ्यांचा मागील काळात विमानतळास तीव्र विरोध असणे, शासनाकडून चांगला दर, नोकरी व परतावा यांचा शेतकऱ्यांना प्रस्ताव, परिणामी शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण होणे, मोबदल्याबाबत जिल्हाधिकारी स्तरावर बैठक होणे, जिल्हाधिकारी यांनी अत्यल्प दर दिल्याने शेतकरी वर्गातून तीव्र नापसंती दर्शविली जाणे, शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दर मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना परिसरातील व्यवहारांचे पुरावे सादर करणे, त्यानुसार दरात वृध्दी होण्याची आवश्यकता, परतावा जमिनीत वाढ करण्याची शेतकऱ्यांची मागणी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

### मा.मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अनुषंगाने दि.१०/०२/२०२६ रोजीच्या बैठकीत मा. मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार पुरंदर विमानतळाकरीता भूसंपादनाची कार्यवाही म.औ.वि. महामंडळामार्फत करावयाची असून त्याकरीता हुडकोकडून कर्ज घेणे व त्यास शासन हमी देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. ही वस्तुस्थिती तसेच या संदर्भात मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. ०३/०२/२०२६ रोजी झालेली सविस्तर बैठक, भूसंपादनासंदर्भातील न्यायालयीन प्रकरणे, शेतकऱ्यांचा विरोध वाढण्याची शक्यता, त्यामुळे सदर जमीन तातडीने संपादन करण्याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे.

सदरील जमीन संपादन करताना जमीन धारकांकडून येणाऱ्या अधिकतम दराच्या मागण्या, विमानतळासारख्या मोठ्या प्रकल्पासाठी एकाच ठिकाणी मोठ्या प्रमाणात भूसंपादनासाठी जमिन उपलब्ध नसणे. तसेच पुणे व परिसरात असलेल्या शेत जमिनी या बागायती शेती प्रकारातील असणे, पुणे व परिसरातील ऑटो हब, एक्सपोर्ट हब व जीसीसी यांचे वाढते गुंतवणूकीचे प्रमाण त्यामुळे जमिनी मोठ्या प्रमाणात मुल्यवर्धीत होणे, सदर जमिनी बिनशेती होत असल्यामुळे त्यांची भविष्यात वाढणारी संभाव्य किंमत (Potentional value), सदरील परिसराचे झालेले औद्योगिकीकरण तसेच पिंपरी महानगर प्रदेश भागात या क्षेत्राचा झालेला समावेश इत्यादी महत्त्वाच्या कारणांमुळे जिल्हाधिकारी, पुणे यांना या जमिनधारकांबरोबर भूसंपादनासाठी ५ ते ६ वेळा तडजोडीच्या बैठका घेवून वाढीव मोबदला दराचा प्रस्ताव तयार करावा लागला.

या अनुषंगाने सदर विमानतळाच्या भूसंपादनासंदर्भात जिल्हाधिकारी, पुणे यांनी नव्याने प्रस्तावित केलेला प्रति हेक्टरी रु. ३,७९,७६,२४०/- दराचा प्रस्ताव उच्चाधिकार समितीच्या दि.२४.०४.२०२६ रोजीच्या १८८ व्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. त्यानुषंगाने, भूसंपादनाची प्रत्यक्ष कार्यवाही करणारी यंत्रणा ही जिल्हाधिकारी यांच्या अंतर्गत काम करणारी यंत्रणा आहे व त्यावर स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेवून कार्यवाही करण्याची जबाबदारी भूसंपादनाचे प्रमुख म्हणून जिल्हाधिकारी यांनाच घ्यावी लागणार आहे. या परिस्थितीत जिल्हाधिकारी यांची शिफारस महत्त्वाची असल्याने त्यानुसार निर्णय घेणे गरजेचे आहे हे उच्चाधिकार समितीच्या सदर बैठकीत मान्य करण्यात आले. त्यानुसार पुरंदर विमानतळाकरीता जिल्हाधिकारी, पुणे यांनी निश्चित करुन दिलेला भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम २६ ते ३० नुसार परिगणित केलेला प्रति हेक्टरी रु. ३,७९,७६,२४०/- या मोबदला दराला मा. मंत्रीमंडळ उपसमितीच्या मंजूरीच्या अधिन राहून सदर दर मंजूर करण्यास उच्चाधिकार समितीच्या वरील बैठकीत सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

/७

तसेच मा. मुख्यमंत्री महादेयांच्या अध्यक्षतेखाली उद्योग विभागासाठी स्थापन करण्यात आलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या दि.२६/०५/२०२६ रोजी झालेल्या बैठकीत देखील सदर प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

************************

लक्षवेधी सूचना क्र.१०२

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

श्री. सुनिल प्रभू, श्री. चेतन तुपे, श्रीमती सुलभा खोडके, श्री. अनिल पाटील, ॲड. पराग अळवणी, श्री. अमित साटम, कॅप्टन आर. सेल्वन, श्री. राजन नाईक, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री. संतोष दानवे, श्री.रोहित पाटील, श्री. धनंजय मुंडे, सन्माननीय वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१०२ खालीलप्रमाणे आहे:-

"तामिळनाडूतील मे.सेसन फार्मा कंपनीच्या "कोल्ड्रीफ सिरप" या खोकल्याच्या औषध सेवनाने मध्यप्रदेश, छिंदवाडा येथील १४ तर राज्यस्थान येथील ३ बालकांचा असे एकूण १७ बालकांचा मृत्यु झाल्याची घटना दिनांक ६ ऑक्टोबर, २०२५ रोजी घडणे, सिरफमध्ये डायइथिलीन ग्लायकोल हा विषारी घटक आढळून येणे, सदर प्रकरणी बळींची संख्या सातत्याने वाढणे, दिनांक ९ ऑक्टोबर, २०२५ रोजी नागपूर येथील ३ वर्षीय मुलाचा मृत्यु होणे, विषारी घटक असलेल्या "कोल्ड्रीफ सिरप" च्या एसआरए १३ बॅचचे सिरप न वापरणेबाबत शासनाच्या अन्न व औषध विभागाच्या अधिकाऱ्यांनी इशारा देण्यात येणे, ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदूर्ग, रायगड या पाच जिल्हयात अनेक औषध विक्रेत्यांनी नियमांचे उल्लंघन करुन कफ सिरपची विक्री केल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या सुमारास आढळून येणे, तपास मोहिमेत सुमारे ९८ विक्रेत्यांनी नियमाचे उल्लंघन केल्याने त्यांना अन्न व औषध विभागाने कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणे, कांदिवली (प.) चारकोप येथील मे. ग्लोबल स्टोर कंपनीने शासनाची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीररित्या सुमारे २ लाख ७७ हजार २२८ कोटी रुपये किमतींची ८ प्रकारची ॲलोपॅथीची औषधे अन्न व औषध विभागाने दिनांक ४ ऑक्टोबर, २०२५ रोजी जप्त करण्यात येणे, परंतु अद्यापही सदरहू कंपनीच्या मालकाविरुध्द कोणतीच कारवाई न करणे, केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटनेने दिनांक २५ ऑक्टोबर, २०२५ रोजी दिलेल्या रिपोर्टनुसार देशभरातील ११२ औषधांचे नमूने गुणवत्ता चाचणीत अपात्र ठरल्याची धक्कादायक माहिती उघडकीस येणे, राज्यातील १३ कोटींच्या पुढे लोकसंख्या असतांना औषधांची गुणवत्ता आणि सुरक्षितता यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी केवळ ४५ निरिक्षकांवर असणे, एकूण २०० मंजूर पदांपैकी १५५ पदे वर्षानुवर्षे रिक्त असणे, रिक्त पदांसह पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे तपास कामकाजात येत असलेल्या मर्यादा, राज्य शासनाने संभाव्य घटना टाळण्यासाठी राज्यातील सर्व औषध वितरण दुकान मालकांनी "कोल्ड्रीफ सिरप" औषधांचा साठा गोठवून तात्काळ वितरण थांबविण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा.मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे निवेदन

मे. Sresan Pharma या तामीळनाडू येथील स्थित उत्पादकाकडून COLDRIF SYRUP B.N. SR-१३ या औषधाचा पुरवठा मध्यप्रदेश राज्यात करण्यात आला होता. सदर औषधामुळे मध्यप्रदेश राज्यातील बाधीत मुले नागपूर येथे उपचारासाठी दाखल झाली होती. मध्य प्रदेशमधील सदर मुलांचा दुषित कफ सिरप या

टाप १०४१-१(१००-२-२०२६)

औषधाचे सेवन केल्यामुळे मृत्यु झाला असून महाराष्ट्र राज्यातील एकाही मुलाचा त्यामध्ये समावेश नाही. महाराष्ट्र राज्यामध्ये COLDRIF SYRUP B.N. SR-13 या औषधाचा पुरवठा झाला नसल्याचे औषध नियंत्रक, तामिळनाडू यांच्याकडून स्पष्ट करण्यात आलेले आहे. तथापि, अन्न व औषध प्रशासनाकडून खबरदारी म्हणून कोल्ड्रिफ सिरप बॅच क्रमांक एसआर-१३ च्या अनुषंगाने दि.०५.१०.२०२५ व दि.०७.१०.२०२५ रोजी Public Alert जारी करून 'सिरप' या प्रवर्गातील औषधांची डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय विक्री न करण्याबाबत राज्यातील सर्व किरकोळ औषध विक्रेत्यांना निर्देश देण्यात आले होते. तसेच, औषध निरीक्षकांद्वारा सदर औषध राज्यात उपलब्ध आहे किंवा कसे, याबाबत पडताळणी करण्यात आली असून सदर पडताळणीमध्ये उक्त औषध राज्यात वितरीत झाले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. सदर निर्देशाची अंमलबजावणी केली जाते किंवा कसे, यासाठी राज्यात विशेष मोहिम राबविण्यात आली. त्यानुसार, राज्यात ६२७ किरकोळ विक्रेत्यांच्या तपासण्या करण्यात आल्या. त्यापैकी, ३०० औषध विक्रेत्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आल्या असून २२७ किरकोळ औषध विक्रेत्याना विक्री बंद आदेश तर १० किरकोळ औषध विक्रेत्यांचे परवाने रदद करण्यात आले असून २५३ औषध विक्रेत्याचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. त्यापैकी कोकण विभागातील ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड या पाच जिल्हयामध्ये एकूण २३० औषध विक्री दुकांनदारांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये एकूण ८० औषध विक्रेत्यांना डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शन शिवाय कफ सिरप औषध विक्री केल्या प्रकरणी विक्री बंद आदेश व कारणे दाखवा नोटिस बजाविण्यात आल्या. याशिवाय २३० पैकी ११ औषध विक्रेत्यांना इतर कारणास्तव कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आल्या. त्यानुसार, उपरोक्त विक्री बंद व कारणे दाखवा नोटिस बजविण्यात आलेल्या औषध विक्रेत्यापैकी ८८ औषध विक्रेत्यांचे परवाने निलंबित व २ औषध विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आले असून उर्वरित ०१ औषध विक्रेत्यांवर सुनावणीनंतर कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.

दि.०१.१०.२०२५ रोजी मे.इंडियन ग्लोबल स्टोर्स, चारकोप, कांदीवली पश्चिम, मुंबई या ठिकाणी विनापरवाना औषधांची साठवणूक व विक्री प्रकरणी औषध निरीक्षक, बृहन्मुंबई यांनी धाड टाकून एकूण रु.२,७७,२२८/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख सत्याहत्तर हजार दोनशे अठ्ठावीस फक्त) किंमतीचा औषधांचा साठा जप्त करण्यात आला. सदर प्रकरणी ०७ औषधांचे नमुने विश्लेषणसाठी घेण्यात आले असून शासकीय विश्लेषक, अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आले आहेत. सदर विश्लेषण अहवाल प्रलंबित आहेत. सदर औषध साठ्याची कस्टडी Miscellaneous Application No. १८२०/२०२५, Dt. ०३/१०/२०२५ अन्वये मा. न्यायालय, माझगाव कोर्ट यांचेकडून घेण्यात आले असून सदर औषध नमुन्यांचे अहवाल प्राप्त होताच विनापरवाना विक्री व वितरण करण्यासाठी संबधितांविरूद्ध न्यायालयात खटला दाखल करण्यात येईल.

केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटनेने दिनांक २५.१०.२०२५ रोजी दिलेल्या रिपोर्टनुसार देशभरातील ११२ औषधांचे नमूने गुणवत्ता चाचणीत अप्रमाणित आढळले होते. सदर नमूने माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये अप्रमाणित असल्याचे विश्लेषणाअंती घोषित करण्यात आले होते. सदर नमूने हे महाराष्ट्र राज्यातील औषध उत्पादकांनी उत्पादित केलेल्या उत्पादक औषधांचे नाहीत. उपरोक्त नमूद ११२ अप्रमाणित औषध अहवालातील ०३ विश्लेषण अहवाल हे अन्न व औषध प्रयोगशाळा, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले असले तरी सदर औषधांचे

उत्पादक महाराष्ट्र राज्यातील नसून परराज्यातील आहेत. अशा अप्रमाणित औषधांचा वापर त्वरीत थांबवून साठा परत मागविण्याची कार्यवाही औषध नियंत्रक, भारत सरकार यांचे मार्गदर्शक धोरणानुसार करण्यात येते.

महाराष्ट्र राज्यात औषध निरीक्षक या संवर्गाचे २०० मंजूर पदांपैकी ४२ पदे कार्यरत असून १०९ पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगमार्फत दि.२९.०७.२०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार, दिनांक २२.०३.२०२६ रोजी चाळणी परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणार आहे. उर्वरित पदांच्या भरतीसंदर्भात शासन स्तरावर कार्यवाही सुरू असून लवकरच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्याचे प्रस्तावित आहे. सध्यस्थितीत उपलब्ध औषध निरीक्षकांद्वारे उत्पादकांच्या नियमित तपासण्या पूर्ण करण्यात येत असून विक्रेत्यांच्या १००% तपासण्या पुर्ण करणे जरी शक्य होत नसले, तरी अन्न व औषध प्रशासनाकडून दिलेले तपासणी व नमून्यांचे इष्टांक पूर्ण करण्यात येत आहेत.

-3-

********

एच१०४१-२

लक्षवेधी सूचना क्र.१७४६

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२५ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

श्री. विलास तरे, सन्माननीय विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-

"अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ च्या तरतुदीस अनुसरून अन्न व औषध प्रशासनाने विहित पध्दतीने संपूर्ण राज्यात किंवा एखाद्या क्षेत्रात किंवा एखाद्या भागात गुटखा/तंबाखूजन्य पदार्थांच्या उत्पादन, साठा, वितरण व विक्री यास प्रतिबंध केलेला असणे, तंबाखु हे एक प्रकारचे अन्नच आहे, याबाबत वेळोवेळी मा.न्यायालयांनी अधोरेखित केलेले असून त्यावर वेळोवेळी बंदी घालणे, तंबाखु व सुपारीच्या आकर्षक जडण घडणीमुळे मोठ्या प्रमाणात युवकांची ओढ तंबाखु व सुपारीकडे असणे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात तरुण मुले व्यसनांच्या आहारी जाणे, याचा भावी पिढ्यांच्या जनुकी रचनेवर प्रतिकुल परिणाम होणे, तंबाखु, सुपारी, गुटखा इत्यादीमुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन अनेक तरुण मुलांना जठर आतडे व श्वसन यासंबंधीचे विविध आजार होत असल्याचे दिसुन येणे, तंबाखु व निकोटीनयुक्त अन्न पदार्थांवर बंदी घालण्याबाबत वेळोवेळी भारत सरकार आरोग्य व कुटूंब कल्याण, मंत्रालयाने सूचना निर्गमीत करणे, महाराष्ट्रात सन २०१२ पासून प्रतिबंधीत अन्न पदार्थांचे उत्पादन, त्याची विक्री व वाहतूक चोरट्या व अवैध पद्धतीने होत असून, लहान दुकाने, गोदाम, वितरक, पुरवठादार, घाऊक विक्रेते, किरकोळ विक्रेते इ.ठिकाणी बाजारात प्रतिबंधित अन्न पदार्थांची किरकोळ विक्री होत असल्याचे महाराष्ट्रात प्रशासनाने व पोलिसांनी केलेल्या कारवाईतून वारंवार आढळुन येणे,राज्यात तंबाखुजन्य, पान मसाला,गुटखा,सुगंधीत सुपारी इ. पदार्थांना प्रतिबंध घालण्यात आलेला असतांनाही सर्रास विक्री होत असणे,यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना."

---

मा. मंत्री (अन्न व औषध प्रशासन) यांचे निवेदन

राज्यात अन्न व औषध प्रशासनामार्फत अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत गुटखा, पान मसाला, सुगंधित तंबाखू, सुगंधित सुपारी व तत्सम पदार्थांच्या उत्पादन, साठा, विक्री, वाहतूक (महाराष्ट्र राज्यामध्ये व राज्यातून) व वितरण करण्यास दि.२० जुलै २०१२ पासून दरवर्षी १ वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिबंध घालण्यात येत आहे.

अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांनी दि.१६/०७/२०२५ रोजीच्या अधिसूचनेअन्वये संपूर्ण महाराष्ट्र राज्यात तंबाखू आणि सुपारी जी एक तर स्वादिष्ट, सुगंधित किंवा कोणत्याही उक्त अपमिश्रकांसोबत मिसळविली जाते आणि अन्य नावाने चालणारी किंवा गुटखा,

(छेदा) टच १०४०-१ (८००-२-२०२६)

पानमसाला, स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू, स्वादिष्ट / सुगंधित सुपारी, अपमिश्रकेयुक्त उत्पादित चघळण्याची तंबाखू, खर्रा, मावा या स्वरूपात किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधली जाणारी किंवा कसे, ग्राहकाला मिश्रण करण्यास सहजरित्या सुलभ होईल अशा रितीने विकलेली किंवा वितरीत केलेली स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू आणि अपमिश्रकेयुक्त उत्पादित चघळण्याची तंबाखू आणि स्वादिष्ट/सुगंधित सुपारी, गुटखा, पानमसाला, खर्रा, मावा व तत्सम पदार्थ एक उत्पादन म्हणून किंवा निराळे उत्पादन म्हणून आवेष्टीत केलेली किंवा खुले असलेल्या आणि/किंवा विकलेली किंवा कसे, यांची निर्मिती, साठवण, वितरण, वाहतूक (महाराष्ट्र राज्यामध्ये व महाराष्ट्र राज्यातून) किंवा विक्री यास जनतेच्या आरोग्याच्या हितासाठी दि. २० जुलै, २०२५ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिबंधित केलेले आहे.

त्यानुसार राज्यात अन्न व औषध प्रशासनामार्फत नियमितपणे आस्थापनांची तपासणी करून आस्थापनेत प्रतिबंधित पदार्थाचा साठा आढळल्यास सदर साठा जप्त करण्यात येतो. तसेच, सदर आस्थापनेविरुध्द व संबंधित व्यक्ती विरुध्द प्रथम खबरी अहवाल संबंधित पोलीस ठाण्यात नोंदविला जातो. तसेच, प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या साठवणूकीसाठी, विक्रीसाठी पुर्नवापर न होण्याकरिता संबंधित आस्थापना सील केल्या जातात. प्रतिबंधित अन्न पदार्थांची वाहनातून वाहतूक होत असल्यास तसेच, साठा करुन ठेवला असल्यास त्याचा प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या वाहतूकीसाठी व साठवणूकीसाठी पुर्नवापर न होण्याकरिता सदर वाहने जप्त करण्यात येतात.

देशात महाराष्ट्र व्यतिरिक्त इतर राज्यात (जसे कि गुजरात, छत्तीसगड, राजस्थान, कर्नाटक, उत्तर प्रदेश, दिल्ली इत्यादी.) फक्त गुटखा या अन्नपदार्थास प्रतिबंध केलेला आहे. तथापि, पान मसाला, सुगंधित तंबाखू, सुगंधित सुपारी व तत्सम पदार्थास उत्पादन, विक्री, वितरण, साठा, वाहतूक करण्यास प्रतिबंध केलेला नाही. त्यामुळे सदर राज्यात उत्पादित होणाऱ्या पान मसाला, सुगंधित तंबाखू, सुगंधित सुपारी व तत्सम पदार्थाची महाराष्ट्र राज्यात चोरट्या/छुप्या मार्गाने वाहतूक व वितरण होत असल्याचे निदर्शनास येते.

अशा प्रकारे चोरी / छुप्या पध्दतीने विक्री होत असलेला प्रतिबंधित अन्न पदार्थाचा साठा पकडून राज्यात सन २०१२ ते २०२५ या कालावधीत एकूण ४४९ कोटी २७ लाख रुपयांचा प्रतिबंधित अन्न पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला आहे. ९४५४ प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आलेले असून, १०२४१ प्रकरणांमध्ये मा. न्यायालयात खटले दाखल करण्यात आले आहेत.

अन्न व औषध प्रशासनामार्फत राज्यात १ एप्रिल २०२५ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत एकूण ३६५ आस्थापनांच्या तपासणी केल्या असून त्यापैकी ३५४ आस्थापनांमध्ये रु.२२,१७,८९,९१४/- इतक्या किमतींचा प्रतिबंधित पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला आहे. सदर कालावधीत एकूण ८४ वाहने जप्त करण्यात आली असून त्यांची किंमत रु.४,५३,६३,१९९/- अशी आहे. तसेच १०० आस्थापना सील करण्यात आल्या आहेत. तसेच, सर्व प्रकरणी प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यात आले आहेत.



टा.प.१०१०-१अ

राज्यात प्रशासनामार्फत सर्व विभागात नियमितपणे आस्थापनांची तपासणी करून आस्थापनेत प्रतिबंधित पदार्थाचा साठा आढळल्यास सदर साठा जप्त करण्यात येतो. तसेच, प्रतिबंधित अन्न पदार्थाची उत्पादन, वाहतूक (महाराष्ट्र राज्यामध्ये व राज्यातून), विक्री, साठवणूक, वितरण करताना आढळून आलेल्या संबंधित व्यक्तीं / आस्थापनांविरुध्द पुढील तपासासाठी संबंधित पोलीस ठाण्यात फिर्याद देवून भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच, अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ चे कलम ५९ अन्वये गुन्हे नोंदवले जातात. त्या अनुषंगे पोलिसांमार्फत तपास चौकशी पुर्ण करून मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात येतात. भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १२३ अंतर्गत गुन्हे दखलपात्र व अजामीनपात्र आहेत. तसेच, दि.०६.०४.२०१७ रोजीच्या अन्न सुरक्षा आयुक्तांच्या ज्ञापनाव्दारे प्रतिबंधित अन्नपदार्थांची वाहनातून वाहतूक होत असल्यास तसेच, साठा करुन ठेवला असल्यास त्याचा प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या वाहतूकीसाठी व साठवणूकीसाठी पुर्नवापर न होण्याकरिता सदर वाहन जप्त करण्यात येतात तसेच सदर जागा / गोदाम सील करण्याची कारवाई करण्यात येते.

*******

टचप१०४०-२